# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. १८२-१८५

(नागपूर येथील विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीतील बैठका)

**दिनांक : ३ जुलै ते २० जुलै २०१८**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| १८२ | ३ जुलै | रामगिरी निवासस्थान, नागपूर | ६ |
| १८३ | ५ जुलै | विधानभवन, नागपूर | १ |
| १८४ | १२ जुलै | विधानभवन, नागपूर | ६ |
| १८५ | १९ जुलै | विधानभवन, नागपूर | १३ |
| | | एकूण | २६ |

**मंत्रिमंडळ निर्णय**
**दि. ०३ जुलै २०१८**
**(एकूण-६)**

३ जुलै २०१८
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

**आयटीआयमधील तासिका तत्त्वावरील**
**निदेशकांच्या मानधनात वाढीचा निर्णय**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) सैद्धांतिक व प्रात्यक्षिक (Theory & Practical) प्रशिक्षणासाठी तासिका तत्त्वावर नियुक्त केलेल्या निदेशकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

आयटीआयमधील सैद्धांतिक व प्रात्यक्षिक तासिका घेण्यासाठी तासिका तत्त्वावर नियुक्त करावयाच्या शिल्प निदेशक, गणित निदेशक, चित्रकला निदेशक तसेच गणित व चित्रकला निदेशकांच्या सैद्धांतिक तासिकेच्या मानधनात प्रति तासिका ७२ रुपयांवरुन २५० रुपये आणि प्रात्यक्षिक तासिकेच्या मानधनात प्रति तासिका ३६ रुपयांवरुन १२५ रुपये याप्रमाणे सुधारणा करण्यात येणार आहे.

आयटीआयमधील प्रशिक्षणार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी निदेशक उपलब्ध करून देणे आवश्यक असल्यामुळे वेळोवेळी भरतीची कार्यवाही करण्यात येते. मात्र, तातडीच्या प्रसंगी पदभरतीची कार्यवाही करुन नियमित कर्मचारी उपलब्ध होण्यास काही कालावधी लागतो. त्यामुळे या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्त्वावर शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. नियमित कर्मचाऱ्यांच्या वेतन व शैक्षणिक पात्रतेच्या तुलनेत तासिका तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन फारच कमी आहे. विशेषत: ग्रामीण भागात अशा प्रकारची पात्रता असणारे कर्मचारी तासिका तत्त्वावर काम करण्यास इच्छूक नसतात. तसेच नियुक्त केलेल्या उमेदवारांपैकी बरेच उमेदवार कमी मानधनामुळे नियुक्तीनंतरच्या अल्प कालावधीत प्रशिक्षणाचे काम सोडून जातात. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आज हा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

३ जुलै २०१८
वित्त विभाग

मुलांचा जन्म, आजारपण-शिक्षणासाठी
**शासकीय महिला कर्मचाऱ्यांना**
**१८० दिवसांची बालसंगोपन रजा**

मुलांच्या जन्मासह त्यांचे आजारपण आणि शिक्षण यासाठी राज्य शासकीय महिला कर्मचारी, जिल्हा परिषदांमधील शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी, मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कृषि व बिगर कृषि विद्यापीठांसह त्यांना संलग्न असलेल्या महाविद्यालयांमधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी तसेच या सर्व संस्थांमधील पत्नी हयात नसलेले पुरुष कर्मचारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत १८० दिवसांच्या कमाल मर्यादेत बालसंगोपन रजा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

आजच्या निर्णयानुसार शासकीय सेवेचे एक वर्ष पूर्ण करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना हयात असलेल्या त्यांच्या पहिल्या दोन ज्येष्ठतम मुलांच्या संगोपणासाठी या योजनेचा लाभ घेता येणार आहे. मुलांचे वय १८ वर्षे होईपर्यंतच ही रजा लागू राहणार असून बालसंगोपन रजेवर असताना मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यास त्या दिनांकापासून पुढे रजा मिळणार नाही. एका वर्षामध्ये दोन महिन्यांच्या कमाल मर्यादेत रजा देण्यात येणार असून सेवा कालावधीत एक ते चार टप्प्यात (Spell) ती घेता येईल. तथापि, एका आर्थिक वर्षात तीन टप्प्यामध्येही या रजेचा उपभोग घेता येईल. अर्जित व अर्धवेतनी रजा खात्यावर शिल्लक असताना तसेच या रजांना लागून देखील बालसंगोपन रजा घेता येणार आहे. कॅलेंडर वर्षाच्या शेवटच्या महिन्यात घेतलेली रजा पुढील कॅलेंडर वर्षीही सलग असल्यास ती ज्या महिन्यात घेतली त्याच वर्षातील समजली जाणार आहे. बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्यापूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल. रजेच्या कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) मिळणार नाही.

महिला कर्मचाऱ्यांच्या परिविक्षाधीन कालावधीत बालसंगोपन रजा मान्य करता येणार नाही. तथापि, कर्मचाऱ्याच्या मुलाबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे परिविक्षाधीन कर्मचाऱ्यास रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा मंजूर करता येईल. संबंधित महिला-पुरुष

कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी त्याप्रमाणात वाढविला जाईल. त्याचप्रमाणे एखादा कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्वीकारत असेल अशा बाबतीत वेगवेगळ्या ठिकाणी घेण्यात येणाऱ्या रजेचा कालावधी एकत्रित गणला जाईल.

बालसंगोपन रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. तसेच रजेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मान्यता आवश्यक असेल. संबंधित कर्मचाऱ्याची वारंवार रजा घेण्याची प्रवृत्ती नसल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी खात्री करून घेणे आवश्यक आहे. रजा मंजूर करताना पदनिर्मिती होणार नाही व दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. किमान दहा वर्ष सेवा होण्याआधी राज्य शासनाच्या सेवेतून राज्य शासनाव्यतिरिक्त अथवा राज्याच्या एकत्रित निधीतून वेतनावरील खर्च भागविला जात नाही अशा इतर सेवेत जाण्यासाठी किंवा अन्य कारणास्तव कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास अशा कर्मचाऱ्याने बालसंगोपन रजा म्हणून घेतलेल्या कालावधीतील वेतन राज्य शासनास भरल्यानंतरच कार्यमुक्त होता येईल. रजेसाठी पहिल्यांदा अर्ज करताना संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने तशा आशयाचे बंधपत्र (बॉंड) सादर करणे अपेक्षित आहे.

-----०-----

३ जुलै २०१८

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

**शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील**

**अध्यापकीय पदे २०२० पर्यंतच निवड मंडळातर्फे भरणार**

राज्यातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील अध्यापकीय पदे ३१ मार्च २०२० पर्यंतच्या कालावधीसाठी लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळून ती स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक (गट अ), सहयोगी प्राध्यापक (गट अ), सहाय्यक प्राध्यापक (गट ब) या पदांबरोबरच शासकीय दंत महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील दंतशास्त्र विभागाशी संबंधित प्राध्यापक (गट अ), सहयोगी प्राध्यापक (गट अ), सहायक प्राध्यापक (गट ब), दंतशल्यचिकित्सक (गट ब) ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून कायमस्वरूपी वगळण्यात आली होती. ही पदे आयोगाच्या कार्यकक्षेतून कायमस्वरूपी वगळण्याऐवजी ३१ मार्च २०२० पर्यंतच्या कालावधीसाठी वगळण्यास आणि तोपर्यंत ती स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली. तसेच १ एप्रिल २०२० पासून ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत समाविष्ट करण्यासही मंजुरी देण्यात आली. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव अध्यक्ष असलेल्या आठ सदस्यांच्या निवड मंडळातर्फे ही पदे भरली जाणार आहेत. त्याचप्रमाणे गट-अ संवर्गातील सहसंचालक (दंत) आणि शासकीय दंत महाविद्यालये व रुग्णालयांचे अधिष्ठाता (गट-अ) या पदांच्या कामकाजाचे प्रशासकीय स्वरुप लक्षात घेता या पदांबाबत आयोगाची कार्यकक्षा पूर्वीप्रमाणे अबाधित ठेवण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

३ जुलै २०१८

ग्रामविकास विभाग

<u>महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमात सुधारणा</u>

**पीएमआरडीए, ग्रामपंचायतींना अतिरिक्त निधी मिळणार**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (पीएमआरडीए) आर्थिक स्त्रोतांची उपलब्धता करण्याबरोबरच प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील गावांचा विकास होण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमांतर्गत आकारण्यात येणाऱ्या एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्कातून निधी उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम-१९६१ मधील कलम १५८ च्या पोटकलम (१) नुसार आकारण्यात येणाऱ्या एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्कात सवलत देण्याची कोणतीही तरतूद उपलब्ध नव्हती. मात्र, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील (१९५८ चा ६०) कलम ९ च्या खंड (अ) अन्वये एखाद्या विशिष्ट किंवा सामान्य व्यवहारावरील स्टॅम्प ड्युटी भरण्यावर सवलत देण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमांतर्गत अशा प्रकारची सवलत देता येण्यासाठी या कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी या अधिनियमामधील कलम १५८ च्या पोटकलम (१) व (४) मध्ये नवीन परंतुकाचा समावेश करण्यात येणार आहे.

या अधिनियमातील कलम (४) मध्ये परंतुकाचा समावेश केल्यामुळे पुणे जिल्हा परिषदेला पोटकलम (३) नुसार मिळालेल्या एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्काच्या रकमेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निधी मिळणार आहे. त्यासाठी प्राधिकरणामधील पंचायतींच्या कार्यक्षेत्रातील मालमत्तांच्या व्यवहारांमधून जिल्हा परिषदेला मिळालेल्या रकमेतून

पीएमआरडीएला पंचवीस टक्के रक्कम देण्यात येणार आहे. यामुळे पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रातील गावांचा विकास होण्यास मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे आर्मी वेलफेअर एज्यूकेशन सोसायटी आणि मुंबई येथील राधा कलियानदास दरियानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यादरम्यान पुण्याच्या कान्हे येथील जागा व त्यावरील बांधकामाच्या बक्षिसपत्राच्या दस्तास या अधिनियमातील कलम १५८ (१) नुसार द्यावे लागणारे एक टक्का अधिक मुद्रांक शुल्क माफ करण्यास आणि त्याप्रमाणे कायद्यात सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

३ जुलै २०१८
विधि व न्याय विभाग

## अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापणार

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

अहमदनगर जिल्हा व सत्र न्यायालयात श्रीगोंदा, कर्जत आणि जामखेड या तीन तालुक्यातील एकूण २४४८ प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच श्रीगोंदा तालुक्याचे अहमदनगर जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर देखील ६६.५ कि.मी. आहे. त्यामुळे श्रीगोंदा येथे तीन तालुक्यांसाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यात येऊन संबंधित प्रलंबित प्रकरणे या न्यायालयात वर्ग करण्यात येतील. या नवीन न्यायालयामुळे नागरिकांच्या वेळेची आणि पैशांची बचत होणार आहे. या न्यायालयासाठी लागणाऱ्या २० पदांसह एकूण ६४ लाख १ हजार २७८ इतक्या खर्चासही यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

३ जुलै २०१८
वित्त विभाग

## सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान

राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या आणि परिभाषित अंशदान किंवा राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणाऱ्या कर्मचाऱ्याचा दहा वर्षे सेवा होण्यापूर्वी मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली संचित रक्कम देण्याबरोबरच शासनाकडून १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे एखादा कर्मचारी परिभाषित अंशदान किंवा राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य होण्यास पात्र असूनही तांत्रिक किंवा इतर कारणास्तव संबंधित कार्यालयाने त्याचे खाते उघडले नसल्यास देखील कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना वित्त विभागाच्या सहमतीने सानुग्रह अनुदान देण्यात येईल. अशा प्रकरणात खाते उघडण्याच्या दिरंगाईत संबंधित कर्मचाऱ्याचा दोष नसणे आवश्यक आहे.

राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे. या योजनेनुसार सेवा संपल्यानंतर किंवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांचा हिस्सा, राज्य शासनाचे समतुल्य अंशदान आणि त्यावरील व्याज अशी एकत्रित रक्कम देण्यात येते. तथापि, कमी सेवा होऊन मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना कमी रक्कम मिळत होती. अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत कशा प्रकारे मदत करता येईल, याविषयी शिफारशी करण्यासाठी वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार मंत्रिमंडळाने आज निर्णय घेतला.

-----०-----

## मंत्रिमंडळ निर्णय
## दि.०५ जुलै २०१८
## (एकूण-१)

५ जुलै २०१८
विधि व न्याय विभाग

### फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये सुधारणा करण्यास मान्यता

राज्यास लागू करण्यात आलेल्या फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ मधील काही कलमांमध्ये सुधारणा करण्यास तसेच काही कलमांमध्ये नवीन उपशीर्षकांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

फौजदारी प्रक्रिया संहिता हा कायदा १९७३ मध्ये मंजूर झालेला असून त्यामध्ये कालानुरुप बदल करणे आवश्यक झाले होते, त्यामुळे या सुधारणा करण्यात आल्या आहेत. राज्यातील न्यायालयांत फौजदारी प्रकरणांचे तसेच अपिलांचे प्रमाण लक्षणीय असल्यामुळे प्रकरणांची सुनावणी करण्यासह न्याय निवाड्यास वेळ लागतो. केंद्र शासनाने स्थापन केलेल्या न्या. मलिमथ समितीने न्यायदानास होणारा विलंब टाळण्यासाठी फौजदारी कायद्यामध्ये कालानुरुप बदल करण्याविषयी सुचविले आहे. तसेच, १९७३ मधील सामाजिक परिस्थिती, तंत्रज्ञान यांची आजच्या काळाशी तुलना करता आणि त्याकाळी निश्चित करण्यात आलेल्या दंड व रकमा या आजच्या तुलनेत अत्यल्प असल्याने त्यांचा सर्वंकष विचार करुन या कायद्यामध्ये सुधारणा करणे गरजेचे झाले होते.

या कायद्यातील कलम २४, २६, ६४, १०२, १२५, १२६, १६७, २०६, २०९, २२८, २४०, २४४, २५१, २६७, ३२०, ३२१, ३२६, ३५०, ३५७ क, ३५८ व ३७६ यामध्ये दुरुस्ती करण्यास, तसेच कलम २०८ क, ३२३ क, प्रकरण १९ यामध्ये नवीन उपशीर्षक “कक” तर कलम २४३ क ते २४३ च नव्याने समाविष्ट करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

कलम २२८ व २४० नुसार आरोपी न्यायालयापुढे हजर झाल्यानंतर दोषारोपाची मांडणी करता येते. मात्र, अनेकदा तुरुंग प्रशासनाच्या अडचणी, आवश्यक असलेला बंदोबस्त उपलब्ध नसणे अशा कारणांनी आरोपीला न्यायालयासमोर हजर करता येत नाही. परिणामी सुनावणी तसेच आरोपीचा तुरुंग कालावधी वाढतो. या कलमांमध्ये केलेल्या सुधारणांनुसार, आरोपीस न्यायालयासमोर प्रत्यक्ष हजर न करता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे दोषारोपाची मांडणी करता येणार असून यामुळे सुनावणी जलद गतीने होणार आहे.

कलम ४९८ अ हे तडजोडपात्र करण्यात आले असून यामुळे पक्षकारांमध्ये तडजोड झाल्यास त्यांना संपरिक्षेस सामोरे जावे लागणार नाही. कलम ३२१ नुसार, शासकीय अभियोक्ता न्यायालयाच्या संमतीने खटल्यातून माघार घेऊ शकतात. या कलमामध्ये सुधारणा केल्याने, शासकीय अभियोक्त्यांना आता माघार घेताना राज्य शासनाचे त्याबाबतचे लेखी आदेश न्यायालयात दाखल करणे बंधनकारक राहणार आहे. परिणामी अधिकारांचा गैरवापर टळेल. कलम ३५० नुसार समन्स मिळूनही योग्य सबबीशिवाय साक्षीदार न्यायालयात हजर न झाल्यास जास्तीत जास्त १०० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येते. आता ही रक्कम वाढवून १ हजार रुपये करण्यात आली आहे. परिणामी, समन्सचे पालन करण्याचे प्रमाण निश्चितच वाढणार आहे. कलम ३५८ नुसार, निष्कारण अटक केलेल्या व्यक्तीस जास्तीत जास्त १ हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश न्यायालय फिर्यादीस देऊ शकते. या रकमेत वाढ करुन ती २५ हजार रुपये इतकी करण्यात आली आहे. त्यामुळे निष्कारण कोणत्याही व्यक्तीस पोलिसांमार्फत अटक करण्याच्या कृत्यास आळा बसणार आहे.

-----०-----

**मंत्रिमंडळ निर्णय**
**दि.१२ जुलै २०१८**
**(एकूण-६)**

१२ जुलै २०१८
जलसंपदा विभाग

## निम्न वर्धा प्रकल्पास ३६१५ कोटींची चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता

वर्धा जिल्ह्यातील निम्न वर्धा प्रकल्पाच्या ३ हजार ६१५ कोटी २९ लाख रुपयांच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या मान्यतेमुळे हा प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

वर्धा जिल्ह्याच्या आर्वी तालुक्यातील धनोडी येथील वर्धा नदीवर धरण तसेच पूलगाव व खर्डा बॅरेज यांचा या प्रकल्पात समावेश आहे. वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त असलेल्या आर्वी, देवळी, वर्धा आणि हिंगणघाट तालुक्यांना या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. तसेच पिण्याचे पाणी, औद्योगिक पाणी वापर, मत्स्यव्यवसाय यासह जलविद्युत निर्मितीसाठीही हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे.

या प्रकल्पास २००६-०७ पासून वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळत असून नोव्हेंबर २०१५ मध्ये या प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्यात आला आहे. प्रकल्पीय कामे मार्च २०१९ अखेर तर लाभक्षेत्र विकासाची कामे जून २०१९ अखेर पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या बांधकामाची सद्यस्थिती तसेच किंमतवाढीची कारणे यांचा आढावा घेऊन प्रकल्पास २०१६-१७ च्या दरसूचीनुसार ३ हजार ६१५ कोटी २९ लाख रुपयांची चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील नमूद सर्व मुद्यांचे पालन करणे, प्रकल्प घटकांच्या बांधकामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम निश्चित करुन त्यानुसार कामे करणे, उच्च न्यायालयातील प्रलंबित जनहित याचिका तसेच विशेष चौकशी समितीच्या अनुषंगाने चालू किंवा प्रस्तावित चौकश्या, त्यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीला या सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे कोणतीही बाधा पोहोचणार नाही. प्रकल्प कार्यान्वित करण्यातील काही अनियमितता निदर्शनास आल्यास त्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यावर राहील. पूर्ण झालेल्या कामाचे घटकनिहाय अहवाल तयार करुन ही कामे तात्काळ सिंचन व्यवस्थापन यंत्रणेकडे हस्तांतरित करावीत आणि प्राथमिक अवस्थेतील घटक कामावर खर्च करु नये, या अटींच्या अधीन राहून ही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ज्या ठिकाणी वितरिका किंवा लघुकालवे यांची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत, अशा ठिकाणी बंद नलिकेद्वारे सिंचन करण्याचा पर्याय वापरणे आवश्यक आहे.

या प्रकल्पांतर्गत सर्व उपसा सिंचन योजनांच्या पंपाच्या परिचालनासाठी होणारा आवर्ती खर्च कमी करण्यासाठी तसेच योजनेच्या शाश्वत स्वरुपातील परिचालनासाठी सौर उर्जेचा जास्तीत जास्त वापर, त्यासाठी केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालयांतर्गत असलेल्या Energy Efficiency Services Limited (EESL) या सार्वजनिक उपक्रमाचे तसेच राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महाऊर्जा (Maharashtra Energy Development Agency) यांचे सहकार्य घ्यावे लागणार आहे. सौर ऊर्जा वापरासाठी काही यंत्रणा उभारणी आवश्यक असल्यास, त्यास प्रचलित कार्यपद्धतीनुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविणे आवश्यक राहणार आहे.

-----०-----

१२ जुलै २०१८
वन विभाग

## वृक्षारोपणासह संगोपनासाठी
## अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ०.५ टक्के निधी

वृक्षारोपण आणि संगोपनासाठी प्रशासकीय विभागांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींच्या ०.५ टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करुन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

स्वत:ची मोकळी जागा असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, नगर विकास व कृषि यासारख्या प्रशासकीय विभागांसह इतर प्रशासकीय विभागांना एकंदर अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी कार्यक्रमावरील खर्चामधून (पूर्वीची योजनांतर्गत तरतूद) वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी ०.५ टक्क्यांच्या मर्यादेत आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देता येणार आहे. याअंतर्गत २०१८-१९ मधील वृक्षलागवड आणि संगोपनासाठी कार्यालयीन खर्च या शीर्षाखाली जास्तीत जास्त ०.५ टक्के तरतूद वर्ग करून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. आजच्या निर्णयानुसार विभागांना नवीन लेखाशीर्ष देखील घेता येणार आहे.

-----०-----

१२ जुलै २०१८
वन विभाग

## चंद्रपूर जिल्ह्याच्या विसापूरमधील बॉटनिकल गार्डनच्या
## सविस्तर आराखड्यासह आर्थिक तरतुदीस मान्यता

चंद्रपूर जिल्ह्यातील विसापूर येथे बॉटनिकल गार्डन निर्माण करण्यात येत असून त्याच्या सविस्तर आराखड्यासह आवश्यक आर्थिक तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. गार्डनच्या उभारणीचा कालावधी २०१५-१६ ते २०१९-२० असा ठेवण्यासही मान्यता देण्यात आली.

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन उभारण्याचे वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेकडून प्रस्तावित करण्यात आले आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी दुर्मिळ व धोकाग्रस्त प्राणी-वनस्पतींचे संरक्षण-संवर्धन करण्यासह जनसामान्यांना त्यांचे महत्त्व पटवण्यासाठी हे बॉटनिकल गार्डन महत्त्वाचे ठरणार आहे. यापूर्वी ८७ हेक्टर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या गार्डनचे क्षेत्र १०१ हेक्टरपर्यंत वाढविणे, गार्डनच्या उभारणीची तरतूद १११.७६ कोटी करणे आणि निर्मितीचा कालावधी ३ वर्षावरुन ५ वर्ष (२०१५-१६ ते २०१९-२०) करणे या बाबींनाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

१२ जुलै २०१८ / ग्रामविकास विभाग

<u>पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना</u>

## शासकीय जमिनी मुल्यविरहित उपलब्ध करुन देण्यास मान्यता

केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत घरकुलासाठी पात्र ठरलेला ग्रामीण भागातील लाभार्थी जागेअभावी योजनेपासून वंचित राहू नये यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत शासकीय जमिनी मुल्यविरहित उपलब्ध करुन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना २०२२ पर्यंत घरे उपलब्ध करुन देण्याची महत्वाकांक्षी मोहीम केंद्र व राज्य शासनाने हाती घेतली आहे. त्यानुसार राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, या याजनेतील पात्र लाभार्थी केवळ जागेअभावी घरकुलापासून वंचित राहू नयेत यासाठी यापूर्वी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात आली आहे. त्याअंतर्गत घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदीसाठी ५० हजारांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. आजच्या निर्णयानुसार या योजनेसाठी आता शासकीय जमिनी मुल्यविरहित उपलब्ध करुन देता येणार आहेत. त्यानुसार घरकुल पात्र लाभार्थ्यांचे शासकीय जमिनीवर अतिक्रमण असल्यास आणि ती घरकुल बांधकामासाठी उपयुक्त असल्यास अशा प्रकरणी घरकुल योजनेसाठी शासकीय जागा वाटपासंदर्भातील नियम लागू करण्यात येतील. मात्र, अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे नियम लागू करण्यात येणार नाहीत. यासंदर्भात कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची मिशन मोडवर अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

-----०-----

१२ जुलै २०१८
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग

**महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेवर सदस्यांच्या**
**नामनिर्देशनाचे अधिकार आता शासनास**

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेची पहिल्यांदा स्थापना करताना त्यातील सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार राज्य शासनाला मिळण्यासाठी महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम-२०१५ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीने अध्यापन व व्यवसायाच्या विनियमनासह त्यांच्या विकासाशी संबंधित इतर बाबींच्या तरतुदीसाठी १ जुलै २०१७ पासून महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम-२०१५ अंमलात आला आहे. परिषदेची प्रथम स्थापना करताना अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख), (घ) व (ड) मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायींमधले दोन सदस्य, संलग्न ॲक्युपंक्चर संस्थांच्या प्रमुखांमधील एक सदस्य आणि मान्यताप्राप्त संशोधन संस्थांमधील एक सदस्य यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार शासनाला आहेत. मात्र, या अधिनियमातील कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क) नुसार नामनिर्देशनाचे अधिकार राज्य शासनास नव्हते. याअंतर्गत नामनिर्देशनाचे अधिकार राज्य शासनास प्राप्त होण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (७) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्यानुसार या अधिनियमात पूर्वगामी पोटकलमांमध्ये किंवा इतरत्र पहिल्यांदाच परिषद घटित होण्याच्या प्रकरणी काहीही अंतर्भूत असले तरी पोटकलम ३ च्या खंड क मध्ये नमूद केलेले सदस्य राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येणार आहेत. तसेच खंड (ख), (घ) व (ड) मधील तरतुदीनुसार त्या-त्या खंडात नमूद केलेल्या प्रवर्गामधून राज्य शासनाकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहेत.

या अधिनियमातील कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येऊन १५ मे २०१८ पासून परिषद अस्तित्वात आली आहे. त्यामुळे पोट-कलम (३) च्या खंड (क) नुसार सदस्यांचे केलेले नामनिर्देशन या अधिनियमातील पोटकलम ७ खाली करण्यात आलेल्या सुधारणेनुसार करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

-----o-----

१२ जुलै २०१८/ शालेय शिक्षण विभाग

<u>महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियमात सुधारणा</u>

**शाळांच्या भरमसाठ शुल्क आकारणीविरोधात**
**पालकांना अधिकचे अधिकार मिळणार**

शाळा व्यवस्थापनांच्या भरमसाठ शुल्क आकारणीविरोधात पालकांना अधिकचे अधिकार देण्यासाठीच्या तरतुदींचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम-२०११ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

शिक्षणाच्या व्यापारीकरणास प्रतिबंध करण्यासह शैक्षणिक संस्थांकडून होणारी भरमसाठ शुल्क आकारणी आणि नफेखोरी यांना आळा घालण्यासाठी १ डिसेंबर २०१४ पासून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम-२०११ ची अंमलबजावणी राज्यात सुरू करण्यात आली होती. शाळा व्यवस्थापनांकडून करण्यात येत असलेल्या शुल्कवाढीविरुद्ध त्यानंतरही तक्रारी-निवेदने प्राप्त होत होती. त्यामुळे अधिनियमात आणखी सुधारणांची आवश्यकता भासू लागली. त्यानुसार या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. पळशीकरांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने नागरिकांकडून सूचना मागवून त्यावर विचार-विनिमय करुन तयार केलेला अहवाल शासनास सादर केला होता. या अहवालानुसार अधिनियमात करण्यात येत असलेल्या सुधारणांमध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

कार्यकारी समितीत प्रत्येक इयत्तेतून किमान १ व कमाल २ असे एकूण कमाल १३ पालक असतील. तसेच प्रत्येक इयत्तेतून १ शिक्षक याप्रमाणे कमाल १० शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचा १ सदस्य यांचा समावेश असेल. शिक्षक व शाळा व्यवस्थापनाच्या एकूण सदस्यांपेक्षा पालकांची संख्या नेहमी एकने जास्त राहील. शाळा व्यवस्थापनास कार्यकारी समितीच्या मान्यतेने दोन शैक्षणिक वर्षातून एकदा १५ टक्क्यांपर्यंत शुल्क वाढ करण्याची परवानगी देण्यात येईल. तसेच प्रवेशावेळी शाळेने इयत्तानिहाय शैक्षणिक शुल्काची माहिती नोटीस बोर्डावर किंवा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासह अन्य तरतुदींचा समावेश आहे. पूर्व प्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र अधिनियम तयार करण्यात येत असल्याने त्यांना या अधिनियमातून वगळण्यात आले आहे.

-----o-----

**मंत्रिमंडळ निर्णय**
**दि. १९ जुलै २०१८**
**(एकूण-१३)**

१२ जुलै २०१८
वन विभाग

## गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या व्यवहार्यतेसाठी जमिनीच्या हस्तांतरणातील बदलास मान्यता

नागपूरमधील गोरेवाडा येथे उभारण्यात येत असलेला आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्राणी संग्रहालय प्रकल्प व्यवहार्य होण्यासाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळास यापूर्वी मंजूर करण्यात आलेली २५.५७ हेक्टर जमीन नागपूर महापालिकेला देणे आणि त्याबदल्यात नागपूर महापालिकेच्या व्यवस्थापनाखालील तेवढीच पर्यायी जमीन महाराष्ट्र वन विकास महामंडळास हस्तांतरित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागपूर शहरालगत गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय व जैविक उद्यानाची निर्मिती करण्यात येत आहे. या उद्यानाच्या निर्मितीसाठी यापूर्वी महाराष्ट्र वन विकास महामंडळाला त.सा.क्र. ८ अ तहसील नागपूर (शहर) येथील स.क्र.२/१, २/२ आणि २/३ मधील एकूण २५.५७ हे.आर. जमिनीचे हस्तांतरण करण्यात आले होते. मात्र, हा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने ही जमीन नागपूर महापालिकेला देण्यात येणार असून त्याबदल्यात महापालिकेकडील स.क्र. १०६, ११३, ११८, ११९, १२०, १२१ व १२२ मधील २५.५७ हे.आर. जमीन महामंडळाला हस्तांतरित करण्यात येणार आहे. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप तत्त्वावर निर्माण करण्यात येत असलेल्या गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या प्रकल्पात शासनाचे ५१ टक्के भागभांडवल राहणार आहे. शासनाच्या भागभांडवलाचा भाग म्हणून ही वनेतर जमीन कोणतेही बाजाररमुल्य न आकारता अहस्तांतरणीय तत्त्वावर महामंडळाला देण्यात येईल. या जमिनीच्या वाणिज्यिक वापरातून भागभांडवल उभारण्यात येणार आहे.

-----०-----

१२ जुलै २०१८
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

## ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या पाणी आरक्षणासाठी जलसंपदा विभागाच्या पूर्व मंजुरीची आवश्यकता नाही

राज्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य टप्पा-२ आणि मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम याअंतर्गत सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांना राज्य जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील पाण्याचे साठे हे स्त्रोत म्हणून वापरण्यासाठी पाणी आरक्षणास पूर्व मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी मागणी आधारित धोरणांतर्गत अनेक पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. सध्या केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जागतिक बँक सहाय्यित जलस्वराज्य टप्पा-२ हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमदेखील राबविण्यात येत असून या सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांच्याकडून करण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा योजनांसाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील पाणीसाठ्यांचा स्त्रोत म्हणून वापर करावयाचा असल्यास त्यासाठी जलसंपदा विभागाकडील पाणी आरक्षणाच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही, असा निर्णय मंत्रिमंडळाच्या १६ मे २०१७ च्या बैठकीत घेण्यात आला होता. म्हणजेच, मुख्यमंत्री पेयजल योजनेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा योजनांशिवाय इतर सर्व पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी आरक्षण मंजूर करुन घेणे आवश्यक होते. मात्र, पाणी आरक्षणाच्या प्रक्रियेमध्ये होणारा विलंब, त्यामुळे अनुदान वापरामध्ये येणाऱ्या अडचणी, प्रकल्पांवर होणारा परिणाम यामुळे पिण्याचे पाणी पुरविण्याचे उद्दिष्ट्य वेळेवर साध्य होत नाही. या सर्व बाबींचा विचार करता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत सध्या राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य टप्पा-२ आणि मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम यासाठी राज्य जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील पाण्याचे साठे हे स्त्रोत म्हणून वापरावयाचे असल्यास त्यासाठी जलसंपदा विभागाच्या पाणी आरक्षणाच्या पूर्व मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

----०----

१२ जुलै २०१८
कृषी विभाग

**सांगली जिल्ह्यात कृषी महाविद्यालय स्थापण्यास मान्यता**

सांगली जिल्ह्याच्या मौजे पेठ (ता. वाळवा) येथे ६० विद्यार्थी क्षमतेचे क्रांतिसिंह नाना पाटील शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तत्त्वत: मान्यता देण्यात आली. महाविद्यालयासाठी पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच नवीन तंत्रज्ञानाचा समावेश असणाऱ्या अभ्यासक्रमांची निवड करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

सांगली जिल्ह्यात एकही कृषि महाविद्यालय नाही. त्यामुळे आजच्या निर्णयाचा या जिल्ह्याला निश्चित फायदा होणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना असलेल्या शेतीच्या अनुभवास शिक्षणाची जोड दिल्यास पदवी प्राप्त विद्यार्थी हे तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून आपआपल्या परिसरात कार्य करु शकणार आहेत. त्याचप्रमाणे स्वयंरोजगारावर आधारित कृषी उद्योग उभे करण्यासाठी स्थानिक पातळीवरच मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. तसेच या भागातील शेतकऱ्यांना कृषी सेवा व सल्ला उपलब्ध होऊन शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत होईल.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत स्थापण्यात येणाऱ्या या महाविद्यालयासाठी कृषि विभागाने बीज गुणन केंद्राची पेठ (ता. वाळवा) येथील २६.६५ हेक्टर आणि कसबे डिग्रस येथील १५.९१ हेक्टर अशी एकूण ४२.५६ हेक्टर जमीन विद्यापीठाकडे विनामुल्य हस्तांतरित करण्यात येणार आहे. बीज गुणन केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना कृषि विभागाच्या अन्य कार्यालयामधील त्याच किंवा अन्य समकक्ष पदावर सामावून घेतले जाणार आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय ४५ व शिक्षकेतर ६५ अशा एकूण ११० पदांना तत्त्वत: मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी उच्चस्तर सचिव समितीची औपचारिक मान्यता घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयाला पाच वर्षांसाठी ३३ कोटी ४१ लाख १४ हजार रुपये आवर्ती खर्च आणि ३६ कोटी ३० लाख ५३ हजार रुपयांचा अनावर्ती खर्च अशा एकूण ६९ कोटी ७१ लाख ६७ हजार रुपये इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

----o----

१२ जुलै २०१८
कृषी विभाग

**यवतमाळ जिल्ह्यात कृषी महाविद्यालय स्थापण्यास मान्यता**

यवतमाळ येथे ६० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तत्त्वत: मान्यता देण्यात आली. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या महाविद्यालयासाठी मौजे भारी येथे ३० हे. आर जमीन विद्यापीठाकडे विनामुल्य हस्तांतरित करण्यात येणार आहे. महाविद्यालयासाठी पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच नवीन तंत्रज्ञानाचा समावेश असणाऱ्या अभ्यासक्रमांची निवड करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने निश्चित केल्याप्रमाणे या महाविद्यालयासाठी शिक्षक वर्गीय ४५ व शिक्षकेतर ६५ अशा एकूण ११० पदांना तत्त्वत: मंजुरी देण्यात आली. मात्र, त्या पदांना उच्चस्तर सचिव समितीची औपचारिक मान्यता घेणे आवश्यक आहे. या महाविद्यालयास पाच वर्षांच्या वेतनासाठी आवश्यक असणारे २९ कोटी ४८ लाख ६ हजार रुपये, आवर्ती खर्चासाठी १ कोटी १२ लाख ९२ हजार रुपये आणि अनावर्ती खर्चासाठी ३२ कोटी ८७ लाख ३२ हजार रुपये अशा एकूण ६३ कोटी ४८ लाख ३० हजार रुपयांना बैठकीत मान्यता देण्यात आली.

----o----

१२ जुलै २०१८
संसदीय कार्य विभाग

पावसाळी अधिवेशन २० जुलैला संस्थगित

**विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन**

**१९ नोव्हेंबर २०१८ रोजी मुंबईमध्ये होणार**

विधानमंडळाचे सध्या सुरू असलेले पावसाळी अधिवेशन शुक्रवार दि. २० जुलै २०१८ रोजी संस्थगित करण्यासह आगामी हिवाळी अधिवेशन सोमवार दि. १९ नोव्हेंबर २०१८ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

-----o-----

१२ जुलै २०१८
शालेय शिक्षण विभाग

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत**
**विद्यार्थ्यांना चॉकलेट फ्लेवर दुध भुकटी**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पूरक योजना म्हणून इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना चॉकलेट फ्लेवर या स्वादातील दुध भुकटी वाटप करण्यात येणार असून प्रायोगिक तत्त्वावर ही योजना राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील शासकीय शाळांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित शाळा आणि राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प या ठिकाणी असणाऱ्या इयत्ता १ ली ते ८ वीच्या सुमारे १ कोटी १० लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात येतो. या विद्यार्थ्यांना आता पूरक आहार म्हणून प्रतिदिन १८ ग्रॅम याप्रमाणे आठवड्यातून तीन दिवस दुध भुकटी देण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमहिना एकत्रित २२० ग्रॅमचे पाकीट देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना दुध भुकटीपासून तयार केलेले दुध पिण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी चॉकलेट फ्लेवर मध्ये भुकटी देण्यात येणार आहे. या योजनेसाठी येणाऱ्या १३४ कोटींच्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

१२ जुलै २०१८
पदुम विभाग

<u>पोषण आहारात दुध व दुध भुकटीच्या समावेशास मान्यता</u>
**दुध व दुध भुकटी निर्यातीस प्रोत्साहनपर अनुदान**

दुध व दुध भुकटी निर्यातीस प्रोत्साहनपर अनुदान देण्यास आणि विविध विभागांच्या पोषण आहारात दुध व दुध भुकटीच्या समावेशास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने प्रायोगिक तत्त्वावर दुध भुकटी निर्यातीस प्रति किलो ५० रुपये किंवा दुध निर्यातीस प्रति लिटर ५ रुपये इतके प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. हे अनुदान पुढील तीन महिन्यांसाठी देण्यात येणार असून योजनेस मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन त्यापुढे काही कालावधीसाठी योजना सुरु ठेवण्यात येणार आहे. राज्यातील सहकारी व खाजगी दुध प्रक्रिया संस्थांनी उत्पादित केलेल्या पिशवी बंद दुधासाठी हे अनुदान लागू असणार नाही. उर्वरित ३.५/८.५ या गुणप्रतीच्या दुधाच्या रुपांतरणासाठी प्रति लिटर ५ रुपयांप्रमाणे अनुदान दिले जाईल. दुध पुरवठा करणारी किंवा रुपांतरण करणारी संस्था यापैकी एका संस्थेस या अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. तसेच ५ रुपये प्रति लिटर प्रमाणे अनुदानाचा लाभ घेणाऱ्या दुध भुकटी उत्पादकांना दुध व दुध भुकटी निर्यातीसाठीच्या प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ देण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे २१ जुलै २०१८ पासून दुध उत्पादकांना २५ रुपये लिटर प्रमाणे दर देणाऱ्या सहकारी व खाजगी दुध प्रक्रिया संस्था किंवा दुध पुरवठादार संस्थांनाच अनुदान मिळू शकणार आहे.

तसेच शालेय शिक्षण, महिला व बाल कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभाग यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध पोषण आहार योजनांमध्ये दुध किंवा दुध भुकटीचा समावेश करण्यासदेखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी येणारा खर्च संबधित विभागांकडे उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय निधीतून भागविण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व योजनांसाठी १५० कोटींचा आकस्मिकता निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

१२ जुलै २०१८ /सहकार विभाग

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील कुटुंबाची अट शिथिल करण्यास मान्यता

सततचा दुष्काळ आणि नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने लागू केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान (कर्जमाफी) योजना-२०१७ मधील कुटुंबाची अट शिथिल करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत यापूर्वी प्रत्येक अर्जातील सर्व कर्जदार सदस्यांची थकबाकी विचारात घेऊन प्रचलित निकषाप्रमाणे प्रति कुटुंब दीड लाख रुपये मर्यादेपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येत होता. त्याऐवजी आता अर्जातील प्रत्येक सदस्याला या योजनेच्या कर्जमाफीसंबंधी इतर निकषांच्या अधीन राहून दीड लाख रुपये मर्यादेपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे.

सुधारित निकषाप्रमाणे, प्रति शेतकरी अर्जदाराला दीड लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी दिल्यानंतर विचाराधीन कर्जखात्यांच्या पडताळणीत पात्र होणाऱ्या कर्जखात्यांमुळे काही शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांतील थकबाकीची रक्कम दीड लाख रुपयांपेक्षा जास्त होऊ शकेल. अशा परिस्थितीत संबंधित शेतकरी अर्जदारास पूर्वीच दीड लाखाच्या मर्यादेत रक्कम वर्ग केली असल्यामुळे अशा प्रकरणी दीड लाख रुपयांच्यावरील त्यांच्या हिश्श्याची रक्कम शेतकऱ्याने आगाऊ भरण्याबाबत एकरकमी परतफेड योजनेच्या निकषाचे होणारे उल्लंघन क्षमापित करण्यात आले आहे. सुधारित निकषाप्रमाणे अंमलबजावणी केल्यानंतर शेतकऱ्यांनी प्रचलित निकषानुसार दीड लाखाच्यावर भरलेली रक्कम परत करण्यात येणार आहे.

-----०-----

१२ जुलै २०१८/ जलसंपदा विभाग

## निम्न पेढी प्रकल्पास १६३९ कोटींची द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट असलेल्या निम्न पेढी प्रकल्पासाठी १६३९ कोटी ४३ लाख रुपये खर्चाच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा लाभ कृषी सिंचनासह पिण्यासाठी पाणीपुरवठा, औद्योगिक पाणीवापर आणि मत्स्यव्यवसायासाठी होणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात पेढी नदीवर धरण असलेला निम्नपेढी हा खारपाण पट्ट्यातील प्रकल्प असून अमरावती प्रदेशातील अनुशेष कार्यक्रमात त्याचा समावेश आहे. अमरावती व अकोला जिल्ह्यातील भातकुली व मूर्तिजापूर या दुष्काळसदृश्य तालुक्यांतील १० हजार १९२ हेक्टर क्षेत्राला या प्रकल्पाद्वारे सिंचनाचा लाभ मिळणार असून एकूण १६ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत नोव्हेंबर २०१५ मध्ये या प्रकल्पाचा समावेश झाला असून त्याअंतर्गत हा प्रकल्प प्रथम प्राधान्याने पूर्ण करावयाचा आहे. प्रकल्पीय कामे जून २०१९ अखेर व CAD-WM ची कामे डिसेंबर २०१९ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ही कामे पूर्ण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन या प्रकल्पास द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

काही अटी व शर्तींच्या आधारावर मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मान्यता दिली आहे. त्यामध्ये, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील सर्व बाबींची पूर्तता करणे; उपलब्ध निधीचे थीन स्प्रेडिंग (Thin Spreading) टाळण्यासाठी प्रकल्प घटकांच्या बांधकामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम निश्चित करुन त्यानुसार कामे करावीत; उच्च न्यायालयातील प्रलंबित जनहित याचिका, विशेष चौकशी समितीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या किंवा प्रस्तावित चौकश्या आणि त्याअनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीवर या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या निर्णयामुळे कोणतीही बाधा पोहचणार नाही; प्रकल्प कार्यान्वित करण्यात काही अनियमितता निदर्शनास आल्यास त्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर राहील; पूर्ण झालेल्या घटक कामांचे घटकनिहाय समाप्ती अहवाल तयार करुन ही कामे तात्काळ सिंचन व्यवस्थापन यंत्रणेकडे हस्तांतरित करावीत, या बाबींचा समावेश आहे.

या प्रकल्पांतर्गत पारंपरिक कालवे व वितरण व्यवस्थेऐवजी स्वयंचलित दाबयुक्त नलिका प्रणालीचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे तुलनात्मकदृष्ट्या २६४ कोटी ११ लाख इतकी बचत होणार आहे. यापूर्वी काही प्रमाणात पारंपरिक कालवे व वितरण व्यवस्थेसाठी भूसंपादन करुन कामेही झाली आहेत. त्यासाठी झालेल्या १११ कोटी ८९ लाख इतक्या खर्चाचा विचार करून बचतीची गणना करण्यात आली आहे. त्यामुळे आता झालेल्या कामाचा व भूसंपादित केलेल्या जमिनीचा सुयोग्य उपयोग नलिका कामांसाठी किंवा अन्य अनुषंगिक कामांसाठी करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या निधीमध्ये बचतीकरिता विचारात घेतलेल्या गृहितकांमध्ये कोणताही बदल न करता बचत कायम राहील याची खबरदारी घेण्याचे निर्देशही मंत्रिमंडळाने दिले आहेत.

-----०-----

१२ जुलै २०१८
सार्वजनिक आरोग्य विभाग

**वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय**
**५८ वरुन ६० वर्षे करण्यास मान्यता**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ मधील वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ज्ञ या संवर्गातील पदांसह त्यापुढील वरिष्ठ पदे आणि राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा गट अ वैद्यकीय अधिकारी अशा पदांसाठी असणारे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेतील रिक्त पदांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी सोडविण्याबरोबरच रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी आजच्या निर्णयाचा उपयोग होणार आहे. हा निर्णय ३१ मे २०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाच वर्षांसाठी लागू करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

१२ जुलै २०१८
गृह विभाग

राज्याच्या ५१५ कोटींच्या हिश्श्यास मान्यता

**मनमाड-इंदौर रेल्वेमार्गाची संयुक्त भागीदारीतून उभारणी**

जवाहरलाल नेहरू बंदरे ते इंदौर यादरम्यानच्या माल वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणारा ३६२ किमीचा मनमाड-इंदौर हा रेल्वेमार्ग संयुक्त भागीदारीतून उभारणीस केंद्र शासनाच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या रेल्वेमार्गासाठी जवाहरलाल नेहरु बंदरे विश्वस्त, महाराष्ट्र शासन, मध्यप्रदेश शासन आणि सागरमाला डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचा समावेश असलेल्या एकत्रित विशेष उपयोजिता वाहनाची (SPV) स्थापना करण्यात येणार आहे. एसपीव्ही स्थापनेसाठीच्या Memorandum of Understanding च्या मसुद्यासदेखील मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा ५१४.९६ कोटींचा हिस्सा देण्यात येणार असून ही रक्कम विशेष उपयोजिता वाहनाच्या (SPV) एकूण समभागाच्या १५ टक्के असणार आहे. ही रक्कम देताना खोदकामाच्या रॉयल्टीचे १४०.९६ कोटी आणि शासकीय जमिनीचे मुल्य १५.२५ कोटी या रकमा राज्य शासनाचा हिस्सा म्हणून परस्पर वर्ग केल्या जाणार आहेत. उर्वरित ३५८.८५ कोटी एवढी रक्कम पुढील पाच वर्षात अर्थसंकल्पीय योजना खर्च तरतुदींमधुन उपलब्ध करुन दिली जाणार आहे. यात डिझेल किंवा पेट्रोलियम पदार्थांवरील मुल्यवर्धित कर ८१.४० कोटी आणि वस्तू व सेवा कर १७५.४५ कोटी यांचा समावेश असणार आहे. तसेच जवाहरलाल नेहरु बंदर ते मनमाड रेल्वे मार्गाचे बळकटीकरण करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

-----०-----

१२ जुलै २०१८
जलसंपदा विभाग

मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांसंदर्भात प्रकरणनिहाय निर्णय

**गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याबाबतच्या धोरणामध्ये सुधारणा**

राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रित वाळू किंवा रेती काढण्याबाबत निश्चित केलेल्या धोरणातील काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या धोरणाच्या कक्षेतून मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प वगळण्यासह त्यासंदर्भात शासनस्तरावर प्रकरणनिहाय निर्णय घेण्यासदेखील मंजुरी देण्यात आली.

राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रित वाळू किंवा रेती निष्कासनाबाबत ४ मे २०१७ रोजी निश्चित करण्यात आलेल्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल याचिकेवर ४ मे २०१८ रोजी देण्यात आलेल्या आदेशानुसार शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मोठ्या प्रकल्पातील गाळ व गाळमिश्रित वाळू किंवा रेती काढण्याच्या निविदेचा कालावधी १५ वर्षांऐवजी आता १० वर्षांचा असेल. निविदा कालावधीत केलेल्या कामगिरीआधारे संबंधित महामंडळाच्या मान्यतेने आणखी ५ वर्षांसाठी कालावधी वाढविता येईल. कंत्राटदाराच्या पात्रतेअंतर्गत सहकारी संस्थांसाठी असलेली १५ गुणांची तरतूद वगळण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वित्तीय क्षमतेसाठी कमाल ३० गुण, अनुभवासाठी कमाल ३५ गुण आणि यंत्रसामग्रीसाठी कमाल ३५ गुण ठेवण्यात येतील.

न्यायालयीन आदेश, पर्यावरण विभागाची मनाई, नैसर्गिक आपत्ती, जनहीत आणि धरणाची सुरक्षितता इत्यादी कारणांमुळे कंत्राट स्थगित झाल्यास अथवा रद्द झाल्यास कंत्राटदारास कुठलीही नुकसानभरपाई मिळणार नाही, अशी तरतूद अंतिम करारामध्ये करण्यात येईल. तसेच, केंद्र शासन अथवा सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत पर्यावरण विभागाच्या मान्यतेबाबत सूचना किंवा आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार पर्यावरण मान्यता घेणे कंत्राटदारांवर बधनकारक असणार आहे.

मेरी (नाशिक) या संस्थेमार्फत प्रायोगिक तत्त्वावर निवड केलेल्या उजनी प्रकल्प (जि. सोलापूर), गिरणा प्रकल्प (जि. नाशिक), गोसीखुर्द प्रकल्प (जि. भंडारा), जायकवाडी प्रकल्प (जि. औरंगाबाद) आणि मुळा प्रकल्प (जि. अहमदनगर) या पाच मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रित वाळू किंवा रेती काढण्यासाठी एकाच वेळी प्रकल्पनिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविणे, ई-निविदांची कार्यपद्धती, कंत्राटाच्या अटी-शर्ती व आवश्यक मार्गदर्शक सूचना शासन मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळाच्या स्तरावरुन निश्चित करण्यात येणार आहेत.

----o----

१२ जुलै २०१८
महसूल विभाग

**नागपूर येथील राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण संस्थेच्या**
**भाडेकरारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास मान्यता**

भारतीय क्रीडा प्राधिकरणामार्फत (Sports Authority of India) नागपूर येथे क्षेत्रीय केंद्र (Regional Centre) आणि राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण संस्था (National Sports Coaching Institute) उभारण्यात येत आहे. या केंद्रासाठी नागपूर महापालिकेकडून भाडेतत्त्वावर देण्यात येणाऱ्या भूखंडावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

विदर्भासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या या केंद्रासाठी नागपूर महापालिकेकडून मौजा वाठोडा येथील २८.४८ एकर व मौजा तरोडी (खुर्द) येथील १४०.६७ एकर जागा ३० वर्षांच्या कालावधीसाठी नाममात्र दराने भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि नागपूर महापालिका यांच्यात होणाऱ्या भाडेकराराचे ७१ लाख ४२ हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यास महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमातील कलम ९ (अ) अन्वये मान्यता देण्यात आली.

----o----